नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०८/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## गांजा बाळगणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बुटीबोरी :– दिनांक २४/०७/२०२१ चे २४.०० वा. दरम्यान सरतर्फे सपोनि श्री जितेन्द्र वैरागडे, स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा. यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे अप. क्र. ३१८/२०२१ कलम २०, २२, २९ एनडीपीएस ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २४/०७/२०२१ चे २१:३२ वा. ते २३:३० वा. सुमारास आरोपी क्र. १ छोटमल सत्यनारायण मिना, वय २७ वर्ष, २. भुरालाल चित्तरलाल मिना, वय ४३ वर्ष, दोन्ही रा. संजयगांधी नगर लाडपूर(राजस्थान) व ३. अखिलेश परसराम झारीया, वय २५ वर्ष, रा. बगसवई, ता. पाटन, जि. जबलपूर मध्यप्रदेश हे ट्रक क्रमांक आर जे ११/जेबी– ४६३२ चे केबिनमध्ये चार प्लास्टिकच्या पोते ज्यामध्ये ७८ किलो गुंगीकारक वनस्पती गांजा किमती ७,८३,६००/– रुपयाचा वाहतूक करतांना मिळून आले. आरोपीतांना दिनांक २५/०७/२०२१ चे ०३.५६ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. आशिष मोरघडे, पो.स्टे. बोरी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०८/०४/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री पी. वाय लाडेकर, न्यायाधिश, अडिशनल सेशन जज २ नागपूर यांनी वरील नमुद आरोपीतांना १) कलम २०, २२, २९ एनडीपीएस ॲक्ट कायद्यान्वये मध्ये प्रत्येकी १० वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी १,००,०००/–रु. दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती गंगणे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनिश्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकर तराळे, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, श्री अनिल व्यवहारे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर